# THE BOMBAY REGISTRATION OF MARRIAGES ACT, 1953 (BOMBAY V OF 1954)

## मुंबई विवाह नोंदणी अधिनियम, १९५३

### अनुक्रमणिका.

प्रस्तावना.


| कलमें | | पान |
|---|---|---|
| १ | लघु संज्ञा, व्याप्ति व सुरुवात ... ... ... ... ... | ११६९ |
| २ | व्याख्या ... ... ... ... ... ... | ११६९ |
| ३ | विवाह रजिस्ट्रारांची नेमणूक ... ... ... ... ... | ११६९ |
| ४ | राज्यांतील प्रत्येक विवाहाची नोंदणी करणें ... ... ... ... | ११६९ |
| ५ | विवाहविज्ञप्तिपत्रक ... ... ... ... ... ... | ११७० |
| ५-अ | विवाहविज्ञप्तिपत्रक ३० दिवसानंतर पाठविणें ... ... ... ... | ११७० |
| ६ | नोंदवही लोकांना तपासण्यासाठीं खुली असणें ... ... ... ... | ११७० |
| ७ | नोंदणी न केल्यामुळें विवाह अवैध न ठरणें ... ... ... ... | ११७० |
| ८ | कलम ५ चे उपबंध पाळण्यांत हयगय केल्याबद्दल किंवा विवाहविज्ञप्तिपत्रकांत खोटीं विधानें केल्याबद्दल शास्ति. | ११७० |
| ९ | विज्ञप्तिपत्रक दाखल करण्यांत कसूर केल्याबद्दल शास्ति ... ... ... | ११७१ |
| १० | नोंदवही लपवून ठेवल्याबद्दल, नष्ट केल्याबद्दल किंवा त्यांत फेरफार केल्याबद्दल शास्ति | ११७१ |
| ११ | रजिस्ट्रार लोकसेवक असणें ... ... ... ... ... ... | ११७१ |
| १२ | या अधिनियमान्वयें काम करणाऱ्या इसमांना संरक्षण ... ... ... | ११७१ |
| १३ | नियम करण्याचा अधिकार ... ... ... ... ... ... | ११७१ |
| १४ | बचाव ... ... ... ... ... ... ... | ११७१ |

अनुसूचि.


J-1492—73-A.

# सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५*

## [ मुंबई विवाह नोंदणी अधिनियम, १९५३ ]

[ २० जानेवारी १९५४ ]

ह्या अधिनियमांत पुढील अधिनियम वा आदेश यांअन्वयें अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यांत आल्या आहेत.

सन १९५५ चा मुंबई अधिनियम ३६.

### मुंबई राज्यांत विवाहांची नोंदणी करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी मुंबई राज्यांत विवाहांची नोंदणी करण्यासाठीं व यांत यापुढें दिलेल्या कित्येक इतर प्रयोजनांसाठीं तरतूद करणें इष्ट आहे ; त्याअर्थी, याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. (१) या अधिनियमास मुंबई विवाह नोंदणीबाबत अधिनियम, १९५३, असें म्हणावें; लघु संज्ञा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो संबंध मुंबई राज्यास लागू आहे;

(३) हें कलम तावडतोब अंमलांत येईल. अधिनियमाचें बाकीचे उपबंध, राज्य सरकार, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें नेमील अशा प्रदेशांत व अशा तारखेस अंमलांत येतील.

२. विषयांत किंवा संदर्भांत एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास ह्या अधिनियमांत— व्याख्या.

(१) "विवाह करणें" या संज्ञेचा अर्थ, कोणत्याहि प्रकारें किंवा रीतीनें विधियुक्त विवाह लावणें किंवा विवाहबद्ध होणें, असा समजावा ;

(२) "विवाह" या संज्ञेत पुर्नविवाहाचा समावेश होतो;

(३) "ज्ञापन" या संज्ञेचा अर्थ, कलम ५ मध्यें, निर्दिष्ट केलेली विवाहज्ञापन असा समजावा.

(४) "पुरोहित" या संज्ञेचा अर्थ, विधिपूर्वक विवाह लावणारा कोणताहि इसम, असा समजावा ;

(५) "नोंदवही" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वयें सुव्यवस्थित ठेवलेली विवाहाची नोंदवही, असा समजावा ;

(६) "रजिस्ट्रार" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वयें नेमलेला विवाहांचा रजिस्ट्रार असा समजावा ;

(७) "रजिस्ट्रार-जनरल" या संज्ञेचा अर्थ, जन्म, मृत्यु व विवाह यांची नोंदणी अधिनियम, १८८६, याअन्वयें राज्य सरकारनें मुंबई राज्याकरितां नेमलेला जन्म, मृत्यु व विवाह यांचा रजिस्ट्रार-जनरल, असा समजावा ;

(८) "अनुसूचि" म्हणजे, या अधिनियमास जोडलेली अनुसूचि.

३. राज्य सरकारास, ते निर्दिष्ट करील अशा स्थानिक प्रदेशांकरितां त्यास आवश्यक वाटतील इतक्या इसमांची, नांवानें किंवा त्यांच्या पदाच्या नात्यानें, विवाह रजिस्ट्रार म्हणून नेमणूक करण्याचा अधिकार आहे. विवाह रजिस्ट्रारांची नेमणूक.

४. कलम १, पोट-कलम (३) अन्वयें कोणत्याहि प्रदेशांत या अधिनियमाचें उपबंध ज्या तारखेस अंमलांत आणले असतील त्या तारखेनंतर, अशा प्रदेशांत केलेल्या प्रत्येक विवाहाची कलम ५ मध्यें विहित केल्या रीतीनें नोंदणी करण्यांत आली पाहिजे. राज्यांतील प्रत्येक विवाहाची नोंदणी करणें.

---

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

विवाहज्ञापन.

५. (१) कलम ४ लागू असलेल्या विवाहांतील वधुवरांनी किंवा त्यांनीं वयाची १८ वर्षे पूर्ण केली
नसतील तर, त्यांच्या पित्यांनीं किंवा पालकांनीं अनुसूचित निर्दिष्ट केलेल्या नमुन्यांत एक विवाहविज्ञप्तिपत्रक
तयार केले पाहिजे व त्याच्यावर सही केली पाहिजे व त्या विवाहविज्ञप्तिपत्रकाच्या दोन प्रती विवाहाच्या
तारखेपासून तीस दिवसांच्या आंत, त्या प्रदेशाच्या रजिस्ट्रारच्या स्वाधीन केल्या पाहिजेत, किंवा रजिस्टर
पोस्टानें त्यास पाठविल्या पाहिजेत :

परंतु, जेव्हां विवाह वधुवर पक्षाच्या पित्याची किंवा पालकांची परवानगी न घेतां लावण्यांत आला
असेल तेव्हां, अशी वधुवरांनीं—त्यांच्या पित्यानें किंवा पालकानें नव्हे— या पोट-कलमाच्या उपबंधांचे
पालन केलें पाहिजे.

(२) विवाहविज्ञप्तिपत्रकावर विवाहाच्या पुरोहितानें देखील—कोणताहि असल्यास—सही केली
पाहिजे.

(३) विवाहविज्ञप्तिपत्रकासोबत १ रु. फी पाठविली पाहिजे.

(४) रजिस्ट्रारनें अशा विवाहाची एक नोंद वही ठेवली पाहिजे. विवाहविज्ञप्तिपत्रक मिळाल्यावर
रजिस्ट्रारनें ते नोंदवहींत दाखल केले पाहिजे व त्याची दुसरी प्रत रजिस्ट्रार-जनरलकडे पाठविली पाहिजे.

विवाहज्ञापन ३० दिवसानंतर पाठविणें.

५-अ. (१) कलम ५, पोटकलम (१) अन्वयें निर्दिष्ट केल्याप्रमाणें कोणत्याहि विशिष्ट विवाहाचे
विज्ञप्तिपत्रक हे ३० दिवसांची मुदत संपल्यावर रजिस्ट्रारकडे पाठविण्यांत यावे. असें विवाहविज्ञप्तिपत्रक
कलम ५ मध्यें तरतूद केलेल्या नमुन्यांत असले पाहिजे व त्यावर सही केली पाहिजे व त्याबरोबर विहित
केल्याप्रमाणें दहा रुपयांपेक्षा जास्त नाही अशी फी दिली पाहिजे. असें विवाहविज्ञप्तिपत्रक मिळाल्यावर
रजिस्ट्रारनें ते नोंदवहींत दाखल केले पाहिजे, व त्याची दुसरी प्रत कलम ५ मध्यें तरतूद केल्याप्रमाणें
रजिस्ट्रार-जनरलकडे पाठविली पाहिजे.

(२) पोट-कलम (१) मध्यें कांही असले तरीहि, कोणत्याहि इसमानें जर जाणूनबुजून विज्ञप्तिपत्रक
कलम ५, पोट-कलम (१) मध्यें निर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आंत पाठविण्यास कसूर किंवा हयगय केली असेल
तर, तो कलम ८ अन्वयें कोणत्याहि शिक्षेस पात्र ठरेल.

नोंदवही लोकांना तपासणीसाठीं खुली असणें.

६. या अधिनियमान्वयें ठेवलेली नोंदवही सर्व वाजवी वेळीं तपासण्यासाठीं खुली राहील व अर्ज केला
असतां त्यांतील प्रमाणित उतारे, अशा प्रत्येक उताऱ्याबद्दल दोन रुपये याप्रमाणें अर्जदारानें फी दिल्यावर
रजिस्ट्रारनें दिले पाहिजेत.

नोंदणीं न केल्यानें विवाह अवैध न ठरणें.

७. या राज्यांत केलेला व ज्यास हा अधिनियम लागू असेल असा कोणताहि विवाह तो या अधिनियमान्वयें,
नोंदण्यांत आला नव्हता किंवा विवाहविज्ञप्तिपत्रक हे, रजिस्ट्रारच्या स्वाधीन करण्यांत किंवा रजिस्ट्रारकडे
पाठविण्यांत आले नव्हते किंवा असे विज्ञप्तिपत्रक सदोष, नियमबाह्य किंवा चुकीचे होते, केवळ एवढ्याच
कारणावर अवैध आहे असें समजतां कामा नये.

कलम ५ चे उपबंध पाळण्यांत हयगय केल्याबद्दल किंवा विवाह-विज्ञप्ति-पत्रकांत खोटीं विधानें केल्याबद्दल शास्ति

८. जो कोणताहि इसम—

(१) कलम ५ अन्वयें पाठविणें आवश्यक असलेलें विवाहविज्ञप्तिपत्रक स्वाधीन करण्यांत किंवा
पाठविण्यांत जाणूनबुजून कसूर किंवा हयगय करील, अथवा

(२) ज्यांतील महत्त्वाचा तपशील खोटा आहे किंवा खोटा असल्याचें त्यास माहीत आहे किंवा
खोटा आहे असें त्यास वाटण्यास कारण असेल असें कोणतेहि निवेदन अशा विज्ञप्तिपत्रकांत करील,
त्यास, दोषी ठरविण्यांत आले असतां पराकाष्ठा २०० रुपये दंडाची शिक्षा होईल.

९. जो कोणताहि रजिस्ट्रार कलम ५ अन्वयें त्यास सादर केलेले विवाहविज्ञप्तिपत्रक दाखल करण्यांत कसूर करील त्यास, दोषी ठरविण्यांत आले अथवा पराकाष्ठा तीन महिनें मुदतीची सक्त कैदेची शिक्षा किंवा ५०० रुपये पर्यंत दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील. विज्ञप्तिपत्रक दाखल करण्यांत कसूर केल्याबद्दल शास्ति.

१०. जो कोणताहि इसम, नोंदवही किंवा त्याचा कोणताहि भाग लपवून ठेवील किंवा नष्ट करील किंवा त्यांत अप्रामाणिकपणे किंवा लबाडीनें फरफार करील, त्यास दोषी ठरविण्यांत आले असतां पराकाष्ट दोन वर्षे कैदेची शिक्षा होईल व तो दंड केला जाण्यास देखील पात्र होईल. नोंदवही लपवून ठेवल्याबद्दल, नष्ट केल्याबद्दल किंवा त्यांत फेरफार केल्या बद्दल शास्ति.

११. प्रत्येक रजिस्ट्रार हा, भारतीय दंड संहिता याचे २१ व्या कलमाच्या अर्थानुसार लोकसेवक आहे असें समजण्यांत आले पाहिजे. रजिस्ट्रार लोक सेवक असणें.

१२. ह्या अधिनियमान्वयें केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याहि कृत्याबद्दल कोणत्याहि इसमाविरुद्ध दावा, खटला किंवा वध कारवाई दाखल करतां कामा नये. या अधिनियमान्वयें काम करणाऱ्या इसमांना संरक्षण.

१३. (१) राज्य सरकारास, राजपत्रांतील अधिसूचनेंद्वारें व आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस अधीन राहून, ह्या अधिनियमाची प्रयोजनें पार पाडण्यासाठीं नियम करण्याचा अधिकार आहे. नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषतः व वरील अधिकारांच्या सामान्यतेस बाध न यतां अशा नियमांत पुढील सर्व किंवा त्यापैकीं कोणत्याहि गोष्टीची तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(अ) रजिस्ट्रारचीं कामें व अधिकार ;

(ब) ह्या अधिनियमान्वयें ठेवणें भाग असलेली नोंदवही किंवा दप्तर हे, ज्या नमुन्यांत व ज्या रीतीनें ठेवली पाहिजेत, ते नमुनें व रीत ;

(क) नोंदवहृया व दप्तरें ही कोणाच्या अभिरक्षेत ठेवावयाची यासंबंधीं ; व नोंदवहृया व दप्तरे जतन करुन ठेवणें.

१४. हा अधिनियम, विशेष विवाह अधिनियम, १८७२, भारतीय ख्रिस्ती विवाह अधिनियम, १८७२, किंवा पार्शी विवाह व घटस्फोट अधिनियम, सन १९३६, या अन्वयें केलेल्या विवाहांना लागू असणार नाहीं. बचाव.

# अनुसूचि

## नमुना

(कलम ५ पहा)

## विवाहविज्ञप्तिपत्रक

१. विवाहाची तारीख.

२. विवाहाचे ठिकाण (ठिकाण दर्शविण्यास आवश्यक तेवढा तपशील देऊन).

३. (अ) वराचें पूर्ण नांव.
(ब) त्याचें वय.
(क) नेहमीचे राहण्याचे ठिकाण.
(ड) पत्ता.
(इ) विवाहाचे वेळीं वर अविवाहित / विधुर / घटस्फोट घेतलेला आहे किंवा कसें.
किंवा विवाहित असल्यास, त्याच्या किती पत्न्या हयात आहेत.
(फ) वराची सही व तारीख.

४. (अ) वधूचें पूर्ण नांव.
(ब) तिचें वय.
(क) नेहमीचें राहण्याचें ठिकाण.
(ड) पत्ता.
(इ) विवाहाचे वेळीं वधू अविवाहित / विधवा / घटस्फोट घेतलेली होती किंवा कसें
(फ) वधूची सही व तारीख.

५. (अ) वराच्या पित्याचें किंवा पालकाचें पूर्ण नांव.
(ब) त्याचे वय.
(क) नेहमींचें राहण्याचें ठिकाण.
(ड) पत्ता.
(इ) वराच्या पित्याची किंवा पालकाची सही व तारीख.

६. (अ) वधूच्या पित्याचें किंवा पालकाचें पूर्ण नांव.
(ब) त्याचे वय.
(क) नेहमींचें राहण्याचें ठिकाण.
(ड) पत्ता.
(इ) वधूच्या पित्याची किंवा पालकाची सही व तारीख.

७. (अ) विवाहाचें पौरोहित्य करणाऱ्या पुरोहिताचें पूर्ण नांव.
(ब) त्याचे वय.
(क) नेहमीचें राहण्याचें ठिकाण.
(ड) पत्ता.
(इ) विवाहाचें पौरोहित्य करणाऱ्या पुरोहिताची सही व तारीख.